आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रवासी भारतीय दिनानिमित्त परदेशात राहणाऱ्या भारतीयांना प्रधानमंत्र्यांकडून शुभेच्छा

- कथित जमीन घोटाळाप्रकरणी राजदचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांच्यासह कुटुंबीयांवर आरोप निश्चित करण्याचे दिल्लीतल्या न्यायालयाचे आदेश

- इराणमधे सरकारविरोधी निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर १३ दिवसांची इंटरनेट बंदी; आतापर्यंत ४५ जणांचा मृत्यू, २०० पेक्षा जास्त जणांना अटक

**आणि**

- क्वालालांपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया ओपन सुपर 1000 बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पी. व्ही. सिंधुची धडक

**<><><><><>**

देशभरात आज प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जात आहे. ज्यामध्ये भारताच्या विकासात आणि अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या अनिवासी भारतीयांचा सन्मान केला जातो. नऊ जानेवारी १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते, या घटनेचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि जागतिक स्तरावर देशाचा प्रभाव वाढवण्यात प्रवासी भारतीयांचं योगदान यानिमित्त अधोरेखित केलं जातं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रवासी भारतीय दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय प्रवासी समुदाय भारत आणि जग यांच्यातील एक मजबूत सेतू असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. प्रवासी भारतीयांना भारताशी अधिक जवळ आणण्यासाठी सरकारनं अनेक महत्त्वाची पावलं उचलली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

व्यापार, वित्त, तंत्रज्ञान, उर्जा, संसाधनं आणि दूरसंचार क्षेत्रात होणाऱ्या समकालीन जागतिक बदलांमागे मानसिकतेतला बदल हा महत्त्वाचा घटक असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. पॅरिसमध्ये फ्रान्सच्या राजदूतांच्या परिषदेला संबोधित केल्यानंतर जयशंकर समाजमाध्यमावर म्हणाले की, धोरणात्मक स्वायत्तता वाढवण्यासाठी

भारत- फ्रान्स भागीदारी महत्त्वाची आहे. आपण फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छा दिल्या, असंही जयशंकर आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

<><><><><>

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन पुढच्या महिन्यात भारत भेटीवर येणार आहेत. नवी दिल्ली इथं आयोजित करण्यात येणाऱ्या एआय इम्पॅक्ट परिषदेत ते सहभागी होतील. एआय इम्पॅक्ट परिषदेची घोषणा प्रधानमंत्र्यांनी फ्रान्स एआय ॲक्शन परिषदेत केली होती. पुढच्या महिन्यात १९-२० फेब्रुवारी रोजी ही परिषद होणार आहे.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या न्यायालयानं कथित जमीन घोटाळाप्रकरणी राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांचं कुटुंब आणि इतरांविरोधात आरोप निश्चित करण्याचे आदेश आज दिले. याप्रकरणी २३ जानेवारीपर्यंत आरोप निश्चित करावेत, असं न्यायालयानं सांगितलं.

रेल्वेमंत्री असताना लालूप्रसाद यादव यांनी पदाचा गैरवापर करून नोकऱ्यांच्या बदल्यात जमीन मिळवल्याचा आरोप विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी मान्य केला. सीबीआयनं लालूप्रसाद यादव, राबडी देवी, तेजस्वी यादव यांच्यासह इतरांविरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. दरम्यान, हे आरोप राजकीय हेतूने करण्यात आल्याचा बचाव आरोपींनी केला आहे.

<><><><><>

विविध राज्यांमधल्या भाजपाच्या डबल इंजिन सरकारांनी भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि अहंकाराचं विष पेरून लोकांचं जीवन उद्ध्वस्त केल्याची टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहे. विकासाच्या नावाखाली खंडणी मागण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोपही गांधी यांनी समाजमाध्यमावर केला आहे. अंकिता भंडारी हत्या प्रकरणी तसंच उन्नाव बलात्कार प्रकरणात भाजपाशी संबंधित गुन्हेगारांना दिलं जाणारं संरक्षण आणि पीडितांना न्यायासाठी मोजावी लागलेली किंमत साऱ्या देशाने पाहिल्याचं गांधी म्हणाले. आपल्या सरकारला समर्थन देणाऱ्या कोट्याधीशांच्या स्वार्थासाठी नियमांची पायमल्ली करून जंगलं तोडली जात असल्याची टीकाही राहुल गांधी यांनी केली.

**<><><><><>**

कोळसा तस्करी प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाला आयपॅकच्या कार्यालयात शोध घेण्यास मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी अडथळा आणल्याचा आरोप करून सक्तवसुली संचालनालयाने आज पुन्हा एकदा कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेतली. याबद्दल अधिकृत याचिका दाखल करायची परवानगी ईडीच्या वकिलांनी न्यायालयाकडे मागितली. या प्रकरणाची सुनावणी आज अडीच वाजता न्यायमूर्ती शुभ्र घोष यांच्यासमोर होणार आहे. या प्रकरणातल्या सगळ्यांना न्यायालयानं नोटिस बजावल्या आहे.

**<><><><><>**

देशातल्या मादक पदार्थांच्या वाढत्या संकटाला तोंड देण्यासाठी केल्या जाणाऱ्या सामूहिक राष्ट्रीय प्रयत्नांचा आढावा आणि मूल्यमापनासाठी नार्को समन्वय केंद्र- NCORD ची नववी उच्चस्तरीय बैठक आज संध्याकाळी होणार आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला विविध मंत्रालये, विभागांतील प्रमुख अधिकारी, राज्य सरकारांचे प्रतिनिधी तसंच मादक पदार्थांशी संबंधित कायदा अंमलबजावणी संस्थांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

इराणमधे सुरू असलेल्या सरकारविरोधी निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर इराणमधल्या ३१ प्रांतांमधे १३ दिवसांची इंटरनेट बंदी करण्यात आली आहे. यामुळे देशभरातली मोबाईल सेवादेखील विस्कळीत झाली आहे. २८ डिसेंबरला सुरू झालेल्या निदर्शनांमुळे माजलेल्या अराजकतेमुळे आतापर्यंत ४५ जणांचा मृत्यू झाला असून २०० पेक्षा जास्त जणांना अटक करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी निदर्शकांनी रस्ते अडवले असून सरकारविरोधी घोषणाबाजी सुरू आहे.

**<><><><><>**

अमेरिकेनं व्हेनेझुएलात केलेली लष्करी कारवाई ही युद्धाची कृती असल्याचं सांगत हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी निषेध केला आहे. अमेरिकेच्या हल्ल्यात मारल्या गेलेल्या व्हेनेझुएला आणि क्युबाच्या नागरिकांच्या स्मरणार्थ स्मारक उभारायची तसंच त्यांचा गौरव करण्यासाठी एका विशेष आयोगाची स्थापना करण्याची घोषणा रॉड्रिग्ज यानी केली. व्हेनेझुएला आपली शस्त्रं केवळ स्वसंरक्षणासाठी वापरतो असंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, व्हेनेझुएलाच्या सरकारने नुकतीच काही राजकीय कैद्यांची सुटका केल्याचं नोबेल पुरस्कारप्राप्त विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांनी स्वागत केलं. सर्व कैद्यांची सुटका होईपर्यंत आपला लढा सुरू राहील असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

युरोपीय नेत्यांनी ग्रीनलँडबद्दल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना गांभीर्याने घ्यावं, असा इशारा उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी दिला आहे. जागतिक क्षेपणास्त्र सुरक्षेसाठी ग्रीनलँड अतिशय महत्त्वाचा असून काही घातक संघटना यावर डोळा ठेवून आहेत, असं सांगून, युरोपनं जर इथली सुरक्षाव्यवस्था कडक केली नाही, तर अमेरिकेला पावलं उचलावी लागतील, असंही व्हान्स यांनी सांगितलं.

<><><><><>

भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं क्वालालांपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया ओपन सुपर 1000 स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. आज झालेल्या सामन्यात सिंधूची लढत जपानच्या अकाने यामुगची हिच्याशी होती. सामना सुरू झाल्यानंतर सिंधूने पहिला गेम २१–११ असा जिंकला. त्यानंतर यामागुची हिला दुखापत झाल्यानं तिनं सामना सोडला. यामुळे सिंधू स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली. पाच वर्षांनंतर सिंधू प्रथमच या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली आहे.

दरम्यान, या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताचे बॅडमिंटनपटू सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची लढत इंडोनेशियाच्या जोडीशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना दुपारी अडीच वाजता होणार आहे.

<><><><><>

राजकारणातील वैचारिक बांधिलकी कमी होत असून बहुतांश राजकीय पक्षांनी त्यांची मूळ विचारधारा बाजूला ठेवली आहे, असं मत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केलं. पक्षाचे समर्थक वाढवण्यासाठी राजकीय पक्ष  विविध मार्ग अवलंबत असल्याबद्दल पवार यांनी चिंता व्यक्त केली. सध्या देशात, राज्यात ज्या काही राजकीय घडामोडी घडत आहे, त्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाच्या नेत्यांना प्रलोभन देत, त्यांच्यावर दबाव टाकून पक्षांतर करण्यास भाग पाडलं जात आहे.

त्यामुळे आजच्या काळात पक्षांतर ही सामान्य गोष्ट झाली असल्याचं मत उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. उमेदवार तसंच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटलं उपकरणं, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत. पदयात्रा, रॅली आणि सभा या पारंपरिक पद्धतींसह निवडणूक प्रचारात आता कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश झाला आहे.

**//<><><><><>//**